(सिएनआर क्र. एमएचएएच-२०-००००४०-२०१४)

<u>नियमित दिवाणी दावा क्र. ६/२०१४ मधील नि.क्र.८० वरील आदेश</u>

<u>राजु रतन गायकवाड वगैरे १ वि. मोहन कोंडीराम शेरकर वगैरे ३..</u>

१. प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे, मयत वादी क्र. २ नामे विमल रतन गायकवाड हिचे वारस अभिलेखावर घेण्याबाबत व त्याप्रमाणे दिवाणी प्रक्रीया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे अर्जातील संक्षिप्त कथन खालीलप्रमाणे :-

वादीने, प्रतिवादींविरुध्द वाद मिळकतीबाबत जाहिर ठराव व निरंतर मनाई हुकूमाकरीता दावा दाखल केला आहे. दावा न्यायप्रविष्ट असताना वादी क्र. २ विमल रतन गायकवाड ही दिनांक ०३/०८/२०१९ रोजी मयत झाली आहे. ९० दिवसांचे आंत मयत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे परंतू, वादी हे अडाणी व अशिक्षीत असल्याने मयत वादी क्र. २ हिचे वारसांबाबत कारवाई करण्यास विलंब झाला. त्याकरीता नि.क्र.७८ वरील आदेशान्वये विलंब माफ होवून अर्ज मंजुर करण्यात आला आहे. अर्जात नमूद पक्षकार हे मयत वादी क्र. २ हिचे कायदेशिर वारस आहेत. त्यांना दाव्यात पक्षकार म्हणून सामिल करणे आवश्यक आहे. त्यामूळे अर्जात नमूद केल्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होणार नाही. करिता हा अर्ज.

३. प्रतिवादींनी आपले म्हणणे देऊन अर्ज मंजूरीस आक्षेप घेतला की, अर्ज मुदतीत व कायदेशिर नसल्याने नामंजुर करण्यात यावा, असे म्हणणे दिले.

४. वादीतर्फे अर्जाच्या पृष्टयर्थ स्वत:चे शपथपत्र नि.क्र.८१ वर सादर केले आहे. प्रतिवादींनी त्यांच्या म्हणण्याच्या पृष्टयर्थ शपथपत्र दाखल केलेले नाही. प्रस्तुतचा दावा हा अचल संपत्तीबाबतचा आहे. प्रस्तुत दावा हा निरंतर ताकिदीकरीता दाखल केलेला आहे. याबाबत उभयपक्षांत दुमत नाही की, वादी क्र. २ विमल रतन गायकवाड या मयत झाल्या आहेत, याबाबत उभयतांमध्ये दुमत नाही. वादीने नि.क्र. ५६ समवेत वादी क्र. २ हिचे मृत्यू प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केले आहे.

५. दाव्यातील कथन सिध्द् करण्याची जबाबदारी वादींवर आहे. अर्जातील नमूद कारण पहाता वादीने केलेल्या विनंतीप्रमाणे दुरुस्ती आवश्यक असल्याचे दिसून येते. जरी दावा दुरुस्त केला तरी दाव्याचे स्वरुप बदलत नाही. वादीची जी मागणी आहे तिच मागणी कायम रहाते. तसेच प्रतिवादींच्या बचावातही फरक पडत नाही. प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता व न्यायाच्या दृष्टीने व अर्जातील नमूद कारण पाहता अर्ज मंजूरीस सबळ कारण दिसते. करीता आदेश.

**<u>आ दे श..</u>**

१. अर्ज नि.क्र. ८० मंजूर करण्यात येतो.

२. वादीने नि.क्र. ८० मध्ये विनंती केल्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती पुढील तारखेपर्यत किंवा त्यापूर्वी करावी.

Sd/- x x x

( सु.श. देशमुख )

दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

दिनांक : ०३/०३/२०२०. पाथर्डी.